# प्रथम वर्ष कला

# सत्र – १

## मराठी SEC(कौशल्य विकास अभ्यासक्रम) – मुलाखत पूर्व तयारी आणि शब्दांकन कौशल्य

श्रेयांक २

Name of the course: **मुलाखत: पूर्वतयारी आणि शब्दांकन कौशल्य**

| Sr | Heading | Particulars |
|---|---|---|
| 1. | Description of course | विद्यार्थ्यांना विविध कौशल्यांचा परिचय करून देणे हे नवे शैक्षणिक धोरण २०२० मध्ये अधोरेखित केलेले एक महत्त्वाचे सूत्र आहे. हे सूत्र प्रमाणभूत मानून विद्यार्थ्यांमधील लेखनकौशल्य आणि संभाषणकौशल्य विकसित करण्यास पूरक शैक्षणिक वातावरण निर्माण होईल अशा प्रकारच्या अभ्यासपत्रिकांची आखणी करण्यात आली आहे. प्रस्तुत अभ्यासपत्रिकेत मुलाखत घेणे आणि शब्दांकन करणे या प्रक्रियांशी संबंधित कौशल्यांचा, विशेषतः भाषिक कौशल्यांचा परिचय करून देणारे अभ्यासघटक निश्चित करण्यात आले आहेत. या कौशल्यांचा सैद्धांतिक आणि उपयोजित स्वरूपातील शैक्षणिक अनुभव घेण्याची संधी या अभ्यासपत्रिकेअंतर्गत विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार आहे. मुलाखत घेणे आणि शब्दांकन करणे या प्रक्रियांशी संबंधित कौशल्यांना व्यावसायिक पातळीवर महत्त्वाचे स्थान आहे. या अभ्यासपत्रिकेचे अध्ययन करताना विद्यार्थ्यांना प्राप्त होणारे अनुभव त्यांना संबंधित भाषिक कौशल्यांचे व्यावसायिक उपयोजन करण्यासाठी प्रेरणा देऊ शकतील. |
| 2. | Vertical | Skill Enhancement Course |
| 3. | Type | Theory |
| 4. | Credit | 02 (1 credit = 15 Hours for Theory in a semester) |
| 5. | Hours Allotted | 30 |
| 6. | Marks Allotted | 50 |
| 7. | Course Objectives | १. विद्यार्थ्यांना मुलाखत या संभाषणप्रकाराच्या स्वरूपाचा परिचय करून देणे.<br>२. मुलाखतकाराने करावयाच्या पूर्वतयारीची विद्यार्थ्यांना ओळख करून देणे.<br>३. विद्यार्थ्यांना शब्दांकन ही संकल्पना आणि शब्दांकन करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या कौशल्यांचा परिचय करून देणे.<br>४. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शब्दांकन करण्यासाठी प्रोत्साहित करणे. |
| 8. | Course Outcomes | १. विद्यार्थ्यांना मुलाखत या संभाषणप्रकाराच्या स्वरूपाचा परिचय होईल.<br>२. मुलाखतकाराने करावयाच्या पूर्वतयारीची विद्यार्थ्यांना ओळख होईल.<br>३. विद्यार्थ्यांना शब्दांकनाची संकल्पना आणि शब्दांकन करण्यासाठी आवश्यक असणारी कौशल्ये परिचित होतील.<br>४. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शब्दांकन करण्यासाठी प्रेरणा मिळेल. |
| 9. | Modules | घटक एक : मुलाखत - पूर्वतयारी<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका) श्रेयांकन १<br><br>घटक दोन : शब्दांकन : संकल्पना, स्वरूपविशेष आणि शब्दांकनांच्या प्रकारांचा परिचय<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका) श्रेयांकन १ |
| 10. | Text books | N.A. |

| | | |
|---|---|---|
| 11. | Reference books | १. ‘शब्दांकन’, शब्दरूची, ऑगस्ट, २०१८<br>२. आम्हीही इतिहास घडवला, उर्मिला पवार, मीनाक्षी मून, सुगावा प्रकाशन, १९८१<br>३. शब्दांकित, नीतिन दत्तात्रेय आरेकर, डिंपल पब्लिकेशन, मुंबई, २०२२<br>४. माझं क्षितिज, नीतिन दत्तात्रेय आरेकर, अरुण शेवते(संपा.), डिंपल पब्लिकेशन, मुंबई, २०२२<br>५. ‘मास्तरांची सावली’, शब्दांकन -नेहा सावंत, डिंपल पब्लिकेशन, मुंबई, २०१४<br>६. ‘सांगायची गोष्ट म्हणजे’, शब्दांकन- नेहा सावंत, डिंपल पब्लिकेशन, मुंबई,२०१२<br>७. मी तो हमाल, आप्पा कोरपे, शब्दांकन - अश्विनी कावळे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २०१५<br>८. पोलादी बाया, दिपा पवार, हरिती प्रकाशन, पुणे<br>९. व्यावहारिक मराठी, ल.रा. नसिराबादकर, भाषाविकास संशोधन संस्था, कोल्हापूर, २०२३ |
| 12. | Internal Continuous Assessment: 40% | Semester End Examination: 60% (वेळ एक तास) |
| 13. | **अंतर्गत चाचणी परीक्षा : २० गुण**<br>चाचणी परीक्षा / मौखिक परीक्षा /प्रकल्पलेखन / नियत कार्य(Assignment) / सादरीकरण / प्रश्नमंजूषा<br>उपरोक्त कोणत्याही पद्धतीचा अवलंब करून अंतर्गत मूल्यमापन करता येईल. (प्रत्यक्ष उपस्थिती किंवा ऑनलाईन पद्धती) | |
| 14. | बहिर्गत परीक्षा 30 गुण (वेळ एक तास)<br>• प्रत्येकी १५ गुणांचे तीन प्रश्न विचारावेत. त्यापैकी विद्यार्थ्यांनी कोणतेही दोन प्रश्न सोडवावेत.<br>• पहिले दोन प्रश्न दीर्घोत्तरी स्वरूपाचे असावेत. प्रत्येक घटकावर १५ गुणांचे अंतर्गत पर्याय असलेले प्रश्न विचारावेत.<br>• तिसरा प्रश्न सर्व घटकांवर आधारित वस्तुनिष्ठ स्वरूपाचा असावा. (गुण १५) | |

# प्रथम वर्ष कला

# सत्र – २

## मराठी SEC(कौशल्य विकास अभ्यासक्रम) –

## निबंधलेखन आणि मुलाखत

श्रेयांक २

Name of the course: **निबंधलेखन आणि मुलाखत**

| Sr | Heading | Particulars |
|---|---|---|
| 1. | Description of course | नवे शैक्षणिक धोरण २०२० नुसार विषयनिहाय कौशल्यांचा परिचय आणि विकास घडवून आणणारा अभ्यासक्रम निश्चित करणे अपेक्षित आहे. त्यानुसार विविध पातळ्यांवर उपयुक्त ठरू शकणारी लेखनकौशल्ये आणि संभाषणकौशल्ये विकसित करण्यास पूरक शैक्षणिक वातावरण निर्माण होईल अशा प्रकारच्या अभ्यासपत्रिकांची आखणी करण्यास अग्रक्रम देण्यात आला आहे. प्रस्तुत अभ्यासपत्रिकेत मुलाखत देणे आणि निबंधलेखन या प्रक्रियांशी संबंधित कौशल्यांचा, प्रामुख्याने भाषिक कौशल्यांचा परिचय करून देणारे अभ्यासघटक निश्चित करण्यात आले आहेत. या कौशल्यांचा सैद्धांतिक आणि उपयोजित स्वरूपातील शैक्षणिक अनुभव घेण्याची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार आहे. विविध प्रकारच्या स्पर्धा परीक्षा तसेच नोकरी मिळविण्याच्या प्रक्रियेतील एक महत्त्वाचा टप्पा यादृष्टीने अनुक्रमे निबंध लिहिणे आणि मुलाखत देणे इत्यादी बाबींना महत्त्वाचे स्थान असते. या अभ्यासपत्रिकेचे अध्ययन करताना विद्यार्थ्यांना प्राप्त होणारे अनुभव त्यांना संबंधित भाषिक कौशल्यांचे उपयोजन करण्यासाठी पूरक ठरू शकतील. |
| 2. | Vertical | Skill Enhancement Course |
| 3. | Type | Theory |
| 4. | Credit | 02 (1 credit = 15 Hours for Theory in a semester) |
| 5. | Hours Allotted | 30 |
| 6. | Marks Allotted | 50 |
| 7. | Course Objectives | १. निबंधाच्या विविध प्रकारांचा परिचय करून देणे.<br>२. निबंधप्रकारानुसार बदलणाऱ्या भाषेच्या स्वरूपाची ओळख विद्यार्थ्यांना करून देणे.<br>३. मुलाखतीच्या तंत्रांचा परिचय विद्यार्थ्यांना करून देणे.<br>४. विद्यार्थ्यांना निबंध लिहिण्यास आणि मुलाखत देण्यास प्रोत्साहित करणे. |
| 8. | Course Outcomes | १. निबंधाच्या विविध प्रकारांचा विद्यार्थ्यांना परिचय होईल.<br>२. निबंधप्रकारानुसार बदलणाऱ्या भाषेच्या स्वरूपाची ओळख विद्यार्थ्यांना होईल .<br>३. मुलाखत देणे या प्रक्रियेशी संबंधित विविध तंत्रांचा परिचय विद्यार्थ्यांना होईल.<br>४. विद्यार्थ्यांना निबंध लिहिण्यास आणि प्रत्यक्ष मुलाखत देण्यास प्रेरणा मिळेल. |
| 9. | Modules | घटक एक : निबंधलेखन: निबंधलेखनाच्या प्रकारांसह सैद्धांतिक परिचय व प्रत्यक्ष निबंधलेखन<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका) श्रेयांकन १<br>घटक दोन : स्पर्धा परीक्षांच्या मुलाखतीचे तंत्र व स्वरूप आणि प्रत्यक्ष मुलाखत देणे<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका) श्रेयांकन १ |
| 10. | Text books | N.A. |
| 11. | Reference books | १. व्यावहारिक मराठी, ल.रा. नसिराबादकर, भाषाविकास संशोधन संस्था, कोल्हापूर, २०२३<br>२. व्यावहारिक मराठी, (संपा.) स्नेहल तावरे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे |

| | | |
|---|---|---|
| | | ३. व्यावहारिक मराठी अध्यापनाच्या दिशा, (संपा.) वसंत शेकडे, ऋतू प्रकाशन, अहमदनगर, २०१२<br>४. व्यावहारिक मराठी, (संपा.) कल्याण काळे, द.दि.पुंडे, निराली प्रकाशन, पुणे<br>५. व्यावहारिक मराठी, लीला गोविलकर, जयश्री पाटणकर, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे<br>६. मराठी लेखन दर्शन, चंद्रहास जोशी, मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे<br>७. उपयोजित मराठी, संजय लांडगे, दिलीपराज प्रकाशन, पुणे<br>८. अनिवार्य मराठी, लीला गोविलकर, के. सागर पब्लिकेशन, पुणे<br>९. व्यक्तिमत्त्व विकासासाठी संभाषण व लेखनकौशल्ये, (संपा.) पृथ्वीराज तौर आणि इतर, अथर्व पब्लिकेशन, २०१८. |
| 12. | Internal Continuous Assessment: 40% | Semester End Examination: 60% (वेळ एक तास) |
| 13. | **अंतर्गत चाचणी परीक्षा : २० गुण**<br>चाचणी परीक्षा / मौखिक परीक्षा /प्रकल्पलेखन / नियत कार्य(Assignment) / सादरीकरण / प्रश्नमंजूषा<br>उपरोक्त कोणत्याही पद्धतीचा अवलंब करून अंतर्गत मूल्यमापन करता येईल. (प्रत्यक्ष उपस्थिती किंवा ऑनलाईन पद्धती) | |
| 14. | बहिर्गत परीक्षा ३० गुण (वेळ एक तास)<br>• प्रत्येकी १५ गुणांचे तीन प्रश्न विचारावेत. त्यापैकी विद्यार्थ्यांनी कोणतेही दोन प्रश्न सोडवावेत.<br>• पहिले दोन प्रश्न दीर्घोत्तरी स्वरूपाचे असावेत. प्रत्येक घटकावर १५ गुणांचे अंतर्गत पर्याय असलेले प्रश्न विचारावेत.<br>• तिसरा प्रश्न सर्व घटकांवर आधारित वस्तुनिष्ठ स्वरूपाचा असावा. (गुण १५) | |